## वादीतर्फे साक्षिदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. श्री.भोसले वकिलांमार्फत शपथेवर सुरू :–

१. मला प्रस्तुत दाव्यासंबंधी संपूर्ण माहिती आहे. माझे वडील सन–२०११ मध्ये वारले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचे पूर्ण नाव नारायण गोविंद सालफळे असे होते. भाग प्रमाणपत्र (निशाणी क्र.३५) मध्ये नारायण गोविंद असे नाव नमुद आहे. हे मी हे सांगु शकत नाही की, माझे वडील नेमक्या कोणत्या वर्षी त्यांच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले होते किंवा कसे. माझे वडील मृत्यू पावले त्यावेळी त्यांचे वय अंदाजे ८७ वर्ष होते. माझे वडील सेवानिवृत्त झाले, त्यावेळी त्यांच्या सेवेत वाढ करण्यात आली होती. त्याबाबतचा दस्त मी अभिलेखावर दाखल केला नाही. हे मी सांगु शकत नाही की, नेमक्या कोणत्या सालापर्यंत माझ्या वडीलांच्या सेवेत वाढ करण्यात आली होती किंवा कसे. माझे वडील मोहता मिल येथे कामगार पदावर कार्यरत होते. हे मी सांगु शकत नाही की, माझे वडीलांच्या मृत्यू पूर्वी त्यांनी किती वर्षापूर्वी मोहता मिल येथील काम सोडले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, भाग प्रमाणपत्र (निशाणी क्र.३५) मध्ये पाच रूपयाचा उल्लेख आहे. हे मी सांगु शकत नाही की, माझ्या वडीलांच्या हयातीत त्यांनी मोहता मिल येथे भाग प्रमाणपत्राच्या मागणीबाबत अर्ज केला होता किंवा कसे. मी स्वत: मोहता मिल येथे

माझ्या वडीलांचे भाग प्रमाणपत्र मिळण्याबाबत कधीही अर्ज केला नाही. भाग प्रमाणपत्र हे माझ्या वडीलांच्या मृत्यू पश्चात अंदाजे सन–२०२१ मध्ये प्राप्त झाल्यामुळे मी त्याबाबत कोणताही अर्ज केला नव्हता. हे मी सांगु शकत नाही की, भागधारक या नात्याने मोहता मिलच्या आम सभेची नोटीस माझ्या वडीलांना कधी आली होती किंवा कसे.

(प्रतिवादीच्या विद्वान वकीलांनी विनंती केल्यावरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.)

समक्ष

**Sd/-**

(व्ही. व्ही. जोशी)
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला.

दिनांक: ३०.०६.२०२६
ठिकाण: अकोला